# सुखना सफाई अभियानात चिकलठाण्यातील रहिवासीही

**औरंगाबाद, दि.१ (लोकमत ब्युरो)-** वसुंधरा दिनानिमित्त सुरू झालेल्या सुखना नदी बचाव अभियानांतर्गत आजही नदीपात्राची सफाई करण्यात आली. सफाईच्या कामात यावेळी चिकलठाणा येथील रहिवासीही मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

इको निडस् फाऊंडेशन या पर्यावरणप्रेमी संस्थेने मागील आठवड्यात वसुंधरा दिनाच्या मुहूर्तावर सुखना बचाव अभियान सुरू केले. याअंतर्गत सुखना नदीच्या पात्राची संपूर्ण सफाई केली जाणार आहे.

मागील आठवड्यात चिकलठाणा पोलिस ठाण्याच्या नियोजित जागेच्या पाठीमागील बाजूस या मोहिमेचा प्रारंभ झाला. त्यानंतर आज दुसऱ्यांदा या ठिकाणी सफाई अभियान राबविण्यात आले. इको निडस्चे अनेक कार्यकर्ते सायंकाळी पाच वाजेच्या सुमारास नदीपात्रात उतरले. यावेळी स्थानिक रहिवाशांनीही त्यांना मोलाचे सहकार्य केले.

या रहिवाशांनीही नदीपात्राची सफाई केली. नदीतील गाळ, प्लास्टिक पिशव्या आणि कचरा बाहेर काढण्यात आला. या अभियानात इको निडस् फाऊंडेशनचे प्रा.प्रियानंद आगळे, रोहित थोरात, ॲड. अत्तदीप आगळे, गजानन मोरे, प्रणव कुसुनेनिवार, सचिन शिरसाट, शिवाजी वाघमारे, सुरेश कांबळे, आठवले तसेच चिकलठाणा येथील सचिन काळे, गोवर्धन खरात, रामभाऊ मुळे, कैलास नवपुते, विक्की भादवे, ज्ञानेश्वर काळे, विजय काकडे, महेश विटकर, श्याम भोसले यांच्यासह अनेक जण सहभागी झाले होते.